HSIL

**PRESS MONITOR**

Publication : Janshakti
Edition : Mumbai
Date : March 06, 2018

---

# मूनबोचा नवीन वॉटर प्युरिफायर दाखल




**मूनबोने** भारतीय बाजारपेठेत अल्फीअस यूव्ही प्लस यूएफ हा नवीन वॉटर प्युरिफायर लॉंच करण्याची घोषणा केली आहे. ९,४९०/- रुपये किमतीच्या या वॉटर प्युरिफायरला टीयूव्ही या जगविख्यात जर्मन प्रमाणीकरण प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ॲल्युमिनिअमपासून तयार करण्यात आलेला सामान्य वॉटर प्युरिफायर एक लिटर पाण्यातून एक कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढू शकतो.तसेच अल्फीअसमध्ये एक लिटर पाण्यातून १०० कोटी सुक्ष्मजीव वेगळे काढण्याची क्षमता आहे. पाण्यामध्ये विरघळलेल्या एकूण घनपदार्थांची पातळी (टीडीएस पातळी) कमी असलेल्या भौगोलिक प्रदेशांसाठी अल्फीअस यूव्ही प्लस यूएफ विशेषत्वाने तयार करण्यात आला आहे. कारण, अशा भागांत आरओ शुद्धीकरणामुळे पेयजलातील अत्यावश्यक क्षार नष्ट होतात आणि ते पाणी अनारोग्यकारक होते. आरओ आधारित वॉटर प्युरिफायर्स पाण्यातील जड धातू आणि अन्य अशुद्ध घटकांसह अत्यावश्यक क्षारही पाण्यातून वेगळे काढतात. त्यामुळे टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्याचा पुरवठा होणार्‍या भागात क्षार संरक्षण (मिनरल फोर्टिफिकेशन) तंत्रज्ञान नसलेले आरओ वॉटर प्युरिफायर्स वापरले जातात, तेव्हा शुद्ध केलेल्या पाण्यातील क्षारांचे प्रमाण मानवी शरीराला आवश्यक प्रमाणाच्या तुलनेत कमी भरते. याउलट, यूव्ही वॉटर प्युरिफायर्समध्ये टीडीएस पातळी कमी असलेल्या पाण्यातील सर्व आवश्यक नैसर्गिक क्षार कायम राखत अशुद्ध घटक काढून टाकण्याची क्षमता असते. यूव्हीला (अल्ट्रा व्हॉयलेट) यूएफची (अल्ट्रा फिल्ट्रेशन) जोड मिळाल्यास जीवाणू आणि पाण्यातील अन्य अशुद्ध घटकांपासून अतिरिक्त संरक्षण मिळते. म्हणूनच पाण्यातील टीडीएस पातळी कमी आहे अशा शहरांसाठी यूव्ही प्लस यूएफ वॉटर प्युरिफायर विकसित करण्यात आला आहे. सिंगल बॉडी स्टेनलेस स्टीलचा यूव्ही स्टरलायझर असलेला हा वॉटर प्युरिफायर सध्या अस्तित्वात असलेल्या ॲल्युमिनिअम बॉडी असलेल्या यूव्ही वॉटर प्युरिफायर्सच्या तुलनेत खूपच चांगला आहे. मूनबो अल्फीअस यूव्ही प्लस यूएफने आपल्या स्टेनलेस स्टीलच्या यूव्ही स्टरलायझरवर कायमस्वरूपी वॉरंटी दिली आहे हे विशेष.